# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाइ णित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ २६९०

दिनांक :- 26 AUG 2019

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/
पु.ला.लातूर/महिला निवासी, लातूर

**विषयः**- आपल्या संस्थेतील जमिनीची मोजणी व संरक्षण करणेबाबत.

**संदर्भ** : १) तंशिले-२४१८/प्र.क्र.१७७/१८/ताशिं-३ दि. १७-११-२०१८

२) तंशिले-२४१८/प्र.क्र.१७७/१८/ताशिं-३ दि. २९-०७-२०१९

३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.९/तंशिसं/२०१९/६६२, दि.०६/०८/२०१९

उपरोक्त विषयी शासनाचे वरील संदर्भ क्र. १ व २ चे पत्र सोबत जोडले असून संदर्भ क्र. १ च्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व शासकीय संस्थांच्या जमिनीची मोजणी अनेक वर्षापासून करण्यात आली नाही. शासकीय संस्थांनी त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर त्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास येते आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या विद्यमान व भविष्यातील संभाव्य विस्तारामध्ये मर्यादा पडत आहेत.

त्यानुषंगाने सर्व शासकीय संस्थांच्या जमिनीची संबधित यंत्रणाकडून शासकीय मोजणी करुन घ्यावी. सर्व शासकीय जमिनीची नोंद योग्य प्रकारे आहे का? हे तपासून अभिलेख अद्ययावत करावे. याबाबत अभिलेख उदा.७/१२ उतारा, अधिकार अभिलेख, मालमत्ता पत्रक इ. दस्तऐवज दरवर्षी अद्ययावत करावे. अतिक्रमण निष्कसित करण्यासाठी महसूल यंत्रणेकडे पाठपूरावा करावा व गरज भासल्यास मा. न्यायालयात दाद मागावी. शासकीय जमिनीवर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी व त्यासाठी त्या त्या संस्थांचे प्रमुख जबाबदार राहतील.

याबाबत योग्य ती कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबतः वरीलप्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी

महाराष्ट्र शासन

स्मरणपत्र क्र.१

क्र.तंशिले-२४१८/प्र.क.१७७/१८/तांशि-३
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दि. २९ जुलै, २०१९.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.

संचालक,
ग्रंथालय संचालनालय, मुंबई.

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व जमिनीची मोजणी व संरक्षण करणेबाबत...

संदर्भ :- शासन समक्रमांकाचे क्र. तंशिले-२४१८/प्र.क.१७७/१८/तांशि-३, दि.१७ नोव्हेंबर, २०१८ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्रान्वये अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

२. तरी वर नमूद केल्यानुसार कार्यवाहीबाबतचा अहवाल त्वरीत शासनास सादर करावा. ही विनंती.

( मनाली सामंत)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. २११-२०१९
दिनांक ०१।०८।२०१९

महाराष्ट्र शासन

क्र.तंशिले-२४१८/प्र.क्र.१७७/१८/तांशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक:- १७ नोव्हेंबर, २०१८

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
संचालक, कला संचालनालय, मुंबई
संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व जमीनींची मोजणी व संरक्षण करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी असे निर्दशनास आले आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या विविध शासकीय शैक्षणिक संस्थांना शासनामार्फत जमीनीचे वाटप केले जाते. सदर जमीनींची मोजणी अनेक वर्षापासून करण्यात आलेली नाही. तसेच काही जमीनी शासकीय शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या नावावर करुन व ताब्यात घेतल्यानंतर त्या जमीनीवर अतिक्रमण झाल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे या शैक्षणिक संस्थांच्या विद्यमान व भविष्यातील संभाव्य विस्तारामध्ये अनेक मर्यादा पडत आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक उपक्रम राबविता येत नाहीत किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), Council of Archtecture इ. शिखर संस्थांच्या निकषानुसार शैक्षणिक सुविधा पुरविता येत नाहीत. परिणामी शैक्षणिक उपक्रम राबविण्यास जमिनीचे क्षेत्र पर्याप्त प्रमाणावर उपलब्ध होत नाही. ही बाब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने अयोग्य आहे. शैक्षणिक प्रयोजनाकरीता राखीव असलेल्या सदर शासकीय जमीनींचा वापर त्याच प्रयोजनार्थ होणे तसेच त्यांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी संबंधीत संस्थेचे प्राचार्य यांची आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत शासकीय संस्थांना ज्या जमिनी शैक्षणिक प्रयोजनार्थ वाटप केलेल्या आहेत, त्या जमीनींची शासकीय यंत्रणेमार्फत मोजणी होणे व अतिक्रमण होऊ नये यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त बाबींकरिता पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण संचालनालय, ग्रंथालय संचालनालय व कला संचालनालय यांनी आपल्या अधिपत्याखालील जेवढ्या शासकीय शैक्षणिक संस्था आहेत, त्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या जमीनींची संबंधित यंत्रणांकडून शासकीय मोजणी करुन घ्यावी.

२) संबंधित संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय जमीनींची नोंद योग्यप्रकारे आहे का हे तपासून अभिलेख अद्ययावत करावे. याबाबत अभिलेख उदा. ७/१२ उतारा, अधिकार अभिलेख, मालमत्ता पत्रक इ. दस्तऐवज दरवर्षी अद्ययावत करावे.

३) अतिक्रमण निष्कसित करण्यासाठी महसूल यंत्रणेकडे पाठपुरावा करावा व गरज भासल्यास मा. न्यायालयात दाद मागावी.

४) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमीनीवर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी व त्यासाठी त्या त्या संस्थांचे प्रमुख जबाबदार असतील.

आपला,

(सतिश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

20/11/18